FORM-1A                                                                                                     00638601 M.C.R.B. I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. २० वर्ष Year २०२३ दिनांक Date २०/०४/२३
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............
3. (a) अपराधाची घटना : वार ........., तारीख पासून २३/०३/२३ वेळ १६:३० तारीख पर्यंत २५/०४/२३ वेळ ............
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २४/०४/२०२३, वेळ Time ............
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२३, तारीख Date २६/०४/२३ वेळ Time ०५:३०
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ............
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ............ Chouki / Beat / O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name पु.का.(जे.बी.नगर) मेट्रो स्टेशनच्या खाली, कोहीनूर हॉटेलच्या समोर, अंधेरी (पू) मुं., ठिकाणाचे नंबर No. if any ............, गल्ली Ward ............, रस्त्याचे नाव Name of road ............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name स्वप्नील धोत्रे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अरुण धोत्रे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८२१२४२४५३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............, दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion ............, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address ............ गल्ली / सर्व्हे नं. Ward ............ घर / नाव नं. House/Name No. ............ फोन / मो. नं. Phone/M. No. ............ पॅन नं. PAN No. ............ वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर, घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   (1) इंद्रजीत गजाननराव देशमुख, वय ३७ वर्षे, धंदा-नोकरी, (क्षेत्र अधिकारी) म.प्र.नि.मं.,
   (2) अनंत चेपटराव काळे, वय ४३ वर्षे, धंदा-नोकरी, (क्षेत्र अधिकारी), म.प्र.नि.मं.,
   कार्यालयीन पत्ता :- कल्पतरू पॉईंट २, ३ व ४ था मजला, सायन माटुंगा, स्कीम रोड नं. ७, सायन सर्कल समोर, सायन (पू) मुंबई.

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

फिर्याद

दि.

मी श्री स्वप्नील अरुण घोलप, वय-28 वर्षे, धंदा-नोकरी (HR Head) रा.ठि. रूम नं. 11, एकनाथ शिवाजी नगर मरोळ पाईप लाईन, अंधेरी (पु) मुंबई-59 यांचा सविस्तर जबाब दिनांक 25/04/2023 रोजी संगणकीकृत करण्यात आलेला असुन तो सोबत जोडला असुन तोच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

(नाना सूर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

जबाब दि. २५/०४/२०२३

मी स्वप्निल अरुण घोलप, वय २८ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी ( डीसी २/एच.आर. हेड ), रा.ठी. रु.नं. ११, एकता चाळ, शिवाजी नगर, मरोळ पाईप लाईन, अंधेरी (पुर्व),मुंबई - ४०० ०५९, मो.नं. ९८२१२४२४५३, आधार कार्ड क्रमांक २०३२ ८४११ १६२७

---------

मी वरील प्रमाणे असून मी १९९४ पासून वरील पत्त्यावर माझे कुंटूबियासह रहात आहे. माझे एमबीए पर्यंतचे शिक्षण सिंहगड इन्स्टिटयुटट, मुंबई येथून पुर्ण झाले असून सन २०२० पासून डीसी-२ कंपनीमध्ये HR - Head म्हणून काम करतो. नमुद कंपनीमध्ये माझे कामगारांचे नियोजन व कंपनीचे व्यवस्थापन पाहणे असे माझे कामाचे स्वरुप आहे. डीसी २ कंपनीमध्ये वाहनांच्या डेंटिंग, पेंटिंग, व इंटेरिअर डिझाईनचे कामकाज केले जाते. सदर कामकाज करत असताना कायदेशीर बाबींची पुर्तता त्याचप्रमाणे शासनाच्या अटी व शर्थींचे योग्यरित्या पालन करण्यात येत असते.

दिनांक २३/०३/२०२३ रोजी सायंकाळी ०४:३० वाजता एक पांढऱ्या रंगाची बोलेरो गाडी कंपनीच्या गेटजवळ आली. नमुद गाडीमध्ये महाराष्ट्र शासन असे लिहिलेला एक बोर्ड होता. सदर गाडीमधून दोन इसम आले. त्यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांची ओळख करुन देताना ते महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्डचे अधिकारी असून त्यांना आमच्या कंपनीची तपासणी करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांचे ओळखपत्र तपासले असता एका ओळखपत्रावर श्री. इंद्रजित देशमुख व दुसऱ्या ओळखपत्रावर श्री. संजय कावरे असे नाव असल्याचे व त्यांनी सांगितल्याप्रमाणे ते महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्डचे अधिकारी असल्याने आम्ही त्यांना कंपनीची चेकींग करण्यास काही हरकत नसल्याचे सांगितले.

श्री. देशमुख व श्री.कावरे यांनी आमच्या कंपनीची पाहणी करुन नंतर कंपनीमध्ये ETP प्लांट नसल्याबाबत विचारणा केली. तसेच कंपनीमध्ये सांडपाण्याची व्यवस्था नीट नाही व वाहनांना बाहेर पेंटिंग करता त्यामुळे तुम्हाला दंड आकारला जावू शकतो असे सांगितले. त्यावर कंपनीच्या वतीने आम्ही नमुद गोष्टीची पुर्तता करण्याकरीता आवश्यक कायदेशीर बाबींबाबत विचारणा करुन त्याकरीता मार्गदर्शन करण्याबाबत सांगितले. त्यावर श्री. देशमुख व श्री. कावरे यांनी आम्ही आज कंपनीचा नमुद अहवाल डिपार्टमेंटला सादर केल्यास कंपनीची लाईट व पाणी बंद होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना तात्पुरता दंड असल्यास तो आम्ही भरण्यास तयार असल्याचे सांगितले. तदनंतर श्री. देशमुख व श्री. कावरे यांनी आपसांत चर्चा करुन काही वेळाने आमचेकडे आले व सदर दंडाची रक्कम मोठी असून त्याचसोबत लाईट व पाणीपुरवठा बंद करण्यात येत असतो. जे कंपनीस परवडणार नाही. त्याऐवजी " आम्ही तुमचा अहवाल पुढे न पाठवता विषय इथेच संपवू. त्याबदल्यात आम्हास रु.१,००,०००/- रोख दे " असे सांगितले. त्यावेळी मी कंपनीचे मालक श्री. निहाल सर यांना सदरबाबत माहिती दिली. त्यावेळी श्री. निहाल सर यांनी कंपनीवर कारवाई न होण्याकरीता नाईलाजास्तव श्री.देशमुख व श्री.कावरे यांना रु.२०,०००/- देवून थोडा वेळ मागून घेण्याबाबत सांगितले. श्री. निहाल यांनी सांगितल्याप्रमाणे मी सदर रक्कम श्री.देशमुख व श्री.कावरे यांना दिले.

तदनंतर वर नमुद श्री. देशमुख व श्री.कावरे हे दिनांक २०/०४/२०२३ रोजी आमच्या कंपनीमध्ये पुन्हा आले. त्यावेळी त्यांनी आमचे मालक श्री. निहाल व माझेकडे उर्वरीत रक्कमेबाबत विचारणा करण्यास सुरुवात केली. सदरवेळी आम्ही त्यांना कळवितो असे सांगितल्यानंतर तेथून निघून गेले. नमुद महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्डचे अधिकारी श्री. देशमुख व श्री. कावरे यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने माझ्या कपंनीचे मालक श्री. निहाल यांचे सांगण्यावरुन मी दिनांक २४/०४/२०२३ रोजी सायंकाळी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ. अविनाश पोवार व पो.नि. नाना सुर्यवंशी यांना भेटुन श्री. देशमुख व श्री.कावरे हे लाचेची मागणी करीत असल्याने कायदेशीर कारवाई करणेबाबत माझी लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. त्यानुसार मी स्वहस्ताक्षरात मराठीमध्ये लिहिलेला तक्रारी अर्ज सही करुन दिला.

मी अर्ज सादर करताना कार्यालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे तसेच सदर दिवशी पडताळणी कारवाई करता येणे शक्य होणार नसल्याचे तपासी अधिकारी यांचे मत झाल्यामुळे दिनांक २५/०४/२०२३ शासकीय पंचासह पडताळणी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे मला दिनांक २५/०४/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता कार्यालयात उपस्थित राहण्याची समज देण्यात आली.

मी दिनांक २५/०४/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई कार्यालयास सकाळी १०.३० वाजता हजर झालो. त्यावेळी दोन शासकीय पंच तसेच पडताळणी / सापळा कारवाई करीता नेमणूकीस असलेले अंमलदार, चालक यांची ओळख करुन देण्यात आली. तदनंतर आम्ही १२:४५ वाजता आम्ही स.पो.आ. पोवार, पो.

नि. सुर्यवंशी, दोन शासकीय पंच व सापळा पथकातील अंमलदार यांचेसमवेत रवाना झालो.पडताळणी दरम्यान मी लोकसेवक श्री. देशमुख व श्री. कावरे यांनी त्यांच्या सोबत आणलेल्या वाहनामध्ये बसलो त्यावेळी लोकसेवक संजय यांनी हाताने खुण करुन, 'समोरील ड्रावर आहे ते तिथे टाक...' असे सांगितले असता मी त्यांना निहाल सर बाहेर गेलेले असल्याने संध्याकाळ पर्यत पैसे हॅन्डओवर करतो. तसेच आपल्या दोघाना 'यापूर्वी एक लाखामधील २०,०००/- दिले आहेत' असे म्हटल्यावर लोकसेवक संजय कावरे यांनी फक्त 'ह' असे केले. त्यावर मी म्हटले की 'ऐंशी हजार दिले आपल्याला त्यानंतर काही दंड वगैरे काही भरावा लागेल.' त्यावर लोकसेवक संजय कावरे यांनी 'काय नाय तुमच्याकडे काहीच नाही' असे म्हटले. त्यावर मी म्हटले की 'आज संध्याकाळ पर्यत पैसे हॅन्डओवर करतो.' त्यावर संजय कावरे म्हणाले की, 'कालच केले पाहिजे होते.' त्यावेळी इंद्रजित देशमुख साहेब काही बोलत नाही म्हणून मी म्हटले 'रागवले आहेत का' असे विचारले असता त्यावर श्री.देशमुख यांनी असे नमुद केले की, 'ऐकतो आहे सर्व, हा बघ आज संध्याकाळ पर्यत' असे बोलून त्यांनी देखील सहमती दर्शवली. त्यानंतर लोकसेवक श्री. संजय कावरे यांनी ' आज संध्याकाळी सहा वाजेपर्यत कर' असे सांगितले. एकुणच दोघांनीही लाचेची मागणी करुन रक्कम स्विकारणेकरीता सहमती दर्शविल्याने मी लाचेची रक्कम जमविण्यास काही वेळ मागून पुन्हा पडताळणी पथक थांबले होते त्या ठिकाणी परत आलो.

सदरवेळी पडताळणी दरम्यान आमच्यामध्ये झालेले संभाषण ऐकल्यावर आलोसे यांनी केलेली लाचेची मागणी सकारात्मक असल्याचे आढळून आल्याने तात्काळ सापळा कारवाई करणार असल्याचे सपोआ पोवार, पो. नि. सुर्यवंशी यांनी सांगितले व मला लाचेची मागणी केलेली रक्कम आणण्याबाबत निर्देश दिल्याने मी तात्काळ कंपनीमध्ये संपर्क साधून आलोसे यांनी मागणी केलेप्रमाणे रु.८०,०००/- रक्कम देणेबाबत विनंती केली असता, कंपनीकडून भारतीय चलनातील रु.२,०००/- किंमतीच्या ४० नोटा दिल्या सदर नोटा मी पो.नि. सुर्यवंशी यांचेकडे दिल्या. सदर रक्कम सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणार असल्याचे पो.नि. सुर्यवंशी यांनी सांगितले. त्याप्रमाणे सर्व कार्यवाही पुर्ण करुन सापळा पथकासह श्री.देशमुख व श्री.कावरे यांनी सांगितल्याप्रमाणे चकाला (जे.बी.नगर) मेट्रो रेल्वे स्टेशन खाली, कोहिनूर कॉन्टिनेंटल हॉटेलसमोर पोहोचलो. सदर वेळी श्री. देशमुख व श्री. कावरे हे बराच वेळ झाला तरी न आल्याने मी त्यांना माझे मोबाईलवरुन फोन केला असता थोडयाच वेळात तेथे पोहोचत असल्याचे सांगितले. काही वेळातच श्री. देशमुख व श्री.कावरे हे त्यांच्या सिल्व्हर कलर हयुंदाई i20 मो/कार क्र.MH-03-CB-8716 ने मी उभा असलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी इशारा केलेप्रमाणे मी त्यांच्या गाडीमध्ये पुढील सिटवर बसलो.त्याचवेळी त्यांनी त्यांचा ड्रायव्हर यास गाडीतून बाहेर जाण्यास सांगितले. व मला इशाऱ्यानेच माझेकडील पैशांचे पाकीट गाडीतील ड्रायव्हर सीट शेजारील सेंटर कन्सोल बॉक्समध्ये पैशांचे पाकीट ठेवण्यास सांगितले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी माझेकडील पैशांचे पाकीट तेथे ठेवून गाडीबाहेर येवून पुर्वनियोजित हात वर करणेचा इशारा केला. पुर्वनियोजीत इशारा मिळताच आलोसे श्री. देशमुख व श्री. कावरे यांना त्यांच्या गाडीमध्ये जागेवर अटकावून ठेवून ड्रायव्हर यास गाडीबाहेर अटकावून ठेवण्यात आले. त्याचवेळी मी गाडीच्या डायव्हर शेजारील सेंटर कन्सोल बॉक्समध्ये पैसे ठेवल्याचे सांगितले. पोलीस पथकाकडून आलोसे श्री.देशमुख व श्री.कावरे यांना ताब्यात घेतले.

तरी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, क्षेत्र अधिकारी, श्री. संजय पोपटराव कावरे व क्षेत्र अधिकारी श्री. इंद्रजीत गजाननराव देशमुख यांनी आमचे कंपनीतील वेस्ट वॉटर ट्रिटमेंट (ETP प्लांट नसल्याने) कारवाई न करण्याकरीता माझेकडे दि. २५/०४/२०२३ पडताळणी वेळी उर्वरित रु ८०,०००/- लाचेची रक्कम मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य करुन रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री. संजय पोपटराव कावरे व श्री. इंद्रजीत गजाननराव देशमुख यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथील क्षेत्र अधिकारी श्री. संजय पोपटराव कावरे, व श्री. इंद्रजीत गजाननराव देशमुख यांचेशी माझे कोणतेही पूर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( नाना सुर्यवंशी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

INSPECTO... ANTI-CORRU... MUMBAI

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......निरंक......

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक यांनी यातील फि. हे, काम करीत DCZ या डेटींग, पेंटींग व इंटेरियर डिझाईनचे सर्विस कंपनीमध्ये प्रदुषण नियंत्रण यासंबंधी दफ्तरी केटरन त्यांच्या कंपनीमध्ये झालेल्या प्रदुषण नियंत्रणासाठी व्यवस्था नसल्याने त्यांच्या नकारात्मक अहवाल शासनाकडे पाठवून मोठी दंडात्मक कारवाई करण्याची भिती दाखवून सदरची कारवाई न करण्यासाठी रु 1,00,000/- लाचेची मागणी केली, दि 23/03/23 रोजी रु 20,000/- स्वीकारून उर्वरित रु. 80000/- लाचेची मागणी केली तक्रार आल्याने त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. येथे दि. 24/04/2023 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 25/04/2023 रोजी पडताळणी/सापळा कारवाई करण्यात

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : आली व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम रु. 80,000/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P. S. .......... District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ......नाना सूर्यवंशी......
पदनाम Rank......पोलीस निरीक्षक......
तपासिक अं. चा कोड क्र. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ..........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**